


जोडपत्र -- "अ" PD (31)

(नियम ३ पहा)

E-4494612

केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

प्रति,
माहिती अधिकारी
सा. बांधकाम विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकारी

१. अर्जदाराचे पूर्ण नाव : विलास महादेव सावंत

२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता : हाऊस नं. ६२/ए, गुलमोहर बिल्डिंगच्या बाजूला, पोस्ट ऑफिस समोर, फाटक रोड, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

(एक) माहितीचा विषय : भाईंदर (प.) येथील "राधास्वामी सत्संग व्यास" या जागेत विविध शेड, वास्तु बनविण्यात आले आहेत त्यांनी या करिता घेतलेल्या परवानगी बाबत ची माहिती"

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी : मागील ५ वर्ष

(तीन) आवश्यक असलेल्या महितीचे वर्णन : भाईंदर (प.) येथील राधास्वामी सत्संग व्यास या जागेत विविध प्रकारचे, आकाराचे शेड, वास्तु, बांधकाम करण्यात आले आहेत या करिता महानगरपालिकेची परवानगी घेतली असल्यास परवानगी, आदेश प्रत, परवानगी मागणी अर्ज सविस्तर माहिती कागदपत्रांच्या सत्यप्रतसह मिळावी.

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या सांक्षाकिंत व सत्यप्रती सही शिक्यानिशी दयाव्यात शासकिय नियमानुसार होणारी फी मी देण्यास तयार आहे.

ठिकाण : भाईंदर
दिनांक : ०६/०२/२०२५

अर्जदाराची सही / अंगठा

(श्री/श्रीमती विलास महादेव सावंत)
9619259111

O/C


# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे - 401 101.

RIGHT TO INFORMATION

दुरध्वनी क्र. 28192828


## बांधकाम विभाग

जा.क्र.मनपा/साबां/ 6968 /2024-25, दि. 12/03 /2025

प्रति,

1) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार,

2) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (पदनिर्देशित अधिकारी)
प्रभाग समिती क्र.01

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- <u>माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती देणेबाबत.</u>
भाईंदर (प.) येथील राधास्वामी सत्संग ब्यास या जागेत विविध शेड, वास्तु बनविण्यात आले आहेत त्यांनी याकरीता घेतलेल्या परवानगी बाबतची माहिती मिळणे.

संदर्भ :- श्री. विलास महादेव सावंत यांचेकडील दि. 07/03/2025 रोजीचे माहिती अधिकार अंतर्गत पत्र. (ई-4494612)

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार अर्जदार, श्री. विलास महादेव सावंत, यांनी भाईंदर (प.) येथील राधास्वामी सत्संग ब्यास या जागेत विविध शेड, वास्तु बनविण्यात आले आहेत त्यांनी याकरीता घेतलेल्या परवानगी बाबतची माहिती अपेक्षीलेली आहे. या कार्यालयामार्फत बांधकाम परवानगी किंवा शेड परवानगी दिली जात नुसन सदरचा विषय हा आपल्या अखत्यारित येत असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005, कलम 6(3) अन्वये सदरचा अर्ज आपणांस वर्ग करण्यांत येत आहे. अर्जदारास आपले विभागाशी संबंधीत माहिती विहीत मुदतीत आपले स्तरावर उपलब्ध करुन द्यावी.

सोबत संदर्भि पत्र जोडत आहे.

(प्रविण दळवी)
जनमाहिती अधिकारी (साबां)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री. विलास महादेव सावंत,
हाऊस नं.62/ए, गुलमोहर बिल्डींगच्या बाजुला
पोष्ट ऑफिस समोर, फाटक रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे.
मो.नं.9619259111

S.M-Jagdale
12/3/25

संदर्भिय पत्रातील विषय नगररचना विभाग व प्रभाग समिती क्र.01 या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 या अर्ज कलम 6(3) अन्वये आपला संदर्भिय अर्ज सदर विभागास वर्ग करण्यात येत आहे. संबंधित विभागाकडुन आपण माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

PC-06/2024-25/PD/MA-2

# सूचना का अधिकार अधिनियम 2005

PD SS

सूचना का अधिकार

266

## प्रारूप "अ"

द्वारा:- 03/3/2025

E-4448194


1. सतोष कुमार तिवारी
सी 04, न्यु मीरा पैराडाईज़
गिता नगर, मीरा भायंदर रोड,
मीरा रोड पूर्व, ठाणे,महाराष्ट्र
मोबाईल नंबर +91 9820228621
boldtiwari@gmil.com





सेवा मे,

2. शासकिय जन माहिती अधिकारी
वांधकाम विभाग
मिराभायंदर महानगर पालिका
भायंदर (पश्चिम) ठाणे महाराष्ट्र

**3.** जानकारिया ः कृपया हमे मिरा भायंदर महानगर पालिका के प्रभाग 1 व 2 विषय मे निम्नलिखीत जानकारीया प्रदान करवाये।

| | |
|---|---|
| 1 | मिरा भायंदर महानगर पालिका के प्रभाग 1 व प्रभाग 2 मे वर्ष 2024-25 मे वांधकाम विभाग द्वारा किये गये विकास कार्यो कि लिस्ट तथा उनके वर्क आर्डर कि प्रत प्रदान करवाये। |
| 2 | वर्ष 2024-25 मे कार्य समाप्त हुए विकास कार्यो के कंप्लिशन सार्टिफिकेट तथा उनके वर्क आर्डर कि प्रत प्रदान कारे। |
| 3 | इन दोनो मुददो के अलावा प्रभाग 1 व 2 मे कौन कौन से पुर्व के विकास कार्य आज तक चल रहे है उनकि लिस्ट तथा कार्यादेश कि प्रत प्रदान करवाये। |

कृपया हमे संपुर्ण जानकारी हो सके तो इलेक्ट्रानिक फोरमेट मे देने कि कृपा करे।

आवेदक

Tiwari
(Santosh Tiwari)
9820228621

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

## सार्व. बांधकाम विभाग

**जा.क्र. मनपा/साबां/** मा.अ/ ...09 **/2025-26** **दि.२८/०४/2025**

प्रति,

**श्री. संतोष कुमार तिवारी**
सी/04, न्यु मिरा पॅराडाईज,
गीता नगर, मिरा भाईंदर रोड,
मिरारोड (पुर्व), ठाणे 401107.

**विषय** :- माहितीचा अधिकार 2005 मधील कलम 19 (1) अन्वये दाखल अपिल.

**संदर्भ** :- 1) आपले कडील दि.03/03/2025 रोजीचे पत्र.
2) इकडील जा.क्र.मनपा/साबां/7158/2024-25 दि.12/03/2025 रोजीचे पत्र.
3) इकडील जा.क्र.मनपा/साबां/7371/2024-25 दि.19/03/2025 रोजीचे पत्र.
4) मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडील जा.क्र.मनपा/साबां/विद्युत/मा.अ./अपिल/588/2025-26 दि.22/04/2025 रोजीचा निर्णय.

वरील विषयानुसार संदर्भिय पत्र क्र. 01 अन्वये माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणेकरीता अर्ज इकडील विभागास प्राप्त झाला असून, संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये इकडील विभागाने विहीत शुल्क भरणेबाबत कळविले आहे. विहीत शुल्काचा भरणा आपणामार्फत केल्यानंतर संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये आपणास माहिती नोंदणीकृत टपालामार्फत देण्यात आलेली होती.

तथापि, प्राप्त झालेल्या माहितीने आपले समाधान झाले नसल्याने, आपणामार्फत दि.02/04/2025 रोजी प्रथम अपिल दाखल केले असून सदर प्रथम अपिल निर्णयवर, मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जातील माहिती पुढील 7 दिवसात नि:शुल्क देणेबाबत निर्णय निर्गमित केला असून खालीलप्रमाणे आपणास प्रभाग निहाय माहिती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | माहितीचा विषय | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका के प्रभाग समिती क्र.01 मे वर्ष 2024-25 मे बांधकाम विभाग व्दारा किये गये विकास कार्यो की लिस्ट तथा उनके वर्क ऑर्डर की प्रत प्रदान करवाए । | सदरची माहिती पृष्ठ क्र.01 ते पृष्ठ क्र.38 सोबत जोडून देण्यात येत आहे. तसेच विकास कामांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आलेली नाही. |
| 2 | सन 2024-25 मे कार्य समाप्त हुए विकास कार्यो के कम्पलीशन सर्टीफीकेट तथा उनके वर्कऑर्डर की प्रत प्रदान करे । | सदरची माहिती पृष्ठ क्र.01 ते पृष्ठ क्र.38 सोबत जोडून देण्यात येत आहे. |
| 3 | इन दोनो मुद्दो के अलावा प्रभाग समिती क्र.01 मे कौन कौन से पुर्व के विकासकार्यआजतक चल रहा है उनकी लिस्ट तथा कार्यादेश की प्रत प्रदान करे । | सदरची माहिती पृष्ठ क्र.39 ते पृष्ठ क्र.58 सोबत जोडून देण्यात येत आहे. तसेच सदर विकास कामांच्या कार्यादेशांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आलेली नाही. |

**(प्रविण दळवी)**
**जनमाहिती अधिकारी तथा**
**कनिष्ठ अभियंता (सा.बां.)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/साबां/मा.अ./ ३६७/2025-26
दि. 22 /04 /2025

प्रति,
श्री. संतोष कुमार तिवारी,
सी/04, न्यु मिरा पॅराडाईज,
गिता नगर, मिरा भाईंदर रोड,
मिरारोड (पूर्व), ठाणे.

**विषय :-** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अपिलाबाबत.
(प्रभाग समिती क्र. 1 व 2 मधील कामांबाबत.)

**संदर्भ :-** आपलेकडील दि. 02/04/2025 (ई-4847078) रोजीचे अपीलचे पत्र.

वरील संदर्भीय विषयानुसार आपण अपील सादर केलेले असुन अपीलाची सुनावणी नियम 19 (6) नुसार माझ्या दालनात दि. 22/04/2025 रोजी स. 11-30 वाजता घेण्यात येणार आहे. तरी आपण स्वत: उपस्थित रहावे.

**अपिलिय अधिकारी (साबां)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
1) श्री. संदीप साळवे, माहिती अधिकारी (साबां)
2) श्री. प्रविण दळवी, माहिती अधिकारी (साबां)
वरील वेळेत सर्व कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

EM973032264IN IVR:6977973032264
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1,28/04/2025,10:47
To:SANTOSH..
PIN:401107, Mira Road S.O
From:MBMC..
Wt:275gms
Amt:35.40,Tax:5.40,Amt.Paid:35.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>

# मिरा भाईदर मह

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्याल

भाईदर (प.), ता.ठाणे-४०११०१

बांधकाम / विद्यु...

जा.क्र.मनपा/साबां/विदयुत/मा.अ/अपिल/ ५९९ /2025-26, दि. 22/04/2025

**अपिलीय अधिकारी तथा उप-अभियंता, बांधकाम विभाग, मिरा भाईदर महानगरपालिका यांच्या समोरील माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 19(6) अन्वये दाखल झालेले अपिल**

**प्रति,**

**1) अपिलकर्ता :-** **श्री. संतोष कुमार तिवारी,**
सी/04, न्यु मिरा पॅराडाईज,
गीता नगर, मिरा भाईदर रोड,
मिरारोड (पूर्व), ठाणे.

**2) जन माहिती अधिकारी :-** **श्री. संदीप साळवे, जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग (प्रभाग समिती क्र. 02)**
**श्री. प्रविण दळवी, जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग (प्रभाग समिती क्र. 01)**

**मुळ अर्जाची तारीख :-** दि. 03/03/2025
**प्रथम अपिलाची तारीख :-** दि. 02/04/2025 (ई-4847078)
**सुनावणी दिनांक :-** दि. 22/04/2025
**वेळ :-** सकाळी 11.30 वा.

## // पुर्वपिठिका //

श्री. संतोष कुमार तिवारी, यांनी माहितीचा अधिकार अन्वये मागणी केलेल्या अर्जातील योग्य माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून प्रथम अपिल दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी माहिती अधिकार अंतर्गत माहिती मिळणेकामी सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्याकडे दि. 03/03/2025 रोजीच्या अर्जाव्दारे “मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 1 व 2 मधील सन 2024-25 या वर्षात झालेल्या बांधकामासंबंधीत” माहिती मिळणेकामी केलेल्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास/अपिलकर्त्यास जा.क्र.मनपा/साबां/7158/2024-25, दि. 12/03/2025 रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देऊन आवश्यक शासकीय शुल्काचा भरणा करणेकामी विहीत मुदतीत कळविलेले आहेत. तद्नंतर अपिलकर्ता यांनी पावती क्र. 412796, दि. 18/03/2025 रोजी शासकीय शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.मनपा/साबां/7371/2024-25,दि. 19/03/2025 रोजीच्या पत्रासोबत आवश्यक माहितीची छायापृष्ठे अपिलकर्ता यांस उपलब्ध करुन दिलेली आहे. तद्नंतर अपिलकर्ता यांनी योग्य माहिती न मिळाल्यामुळे या विभागात दि. 02/04/2025 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे.

## // न्याय निर्णय //

अर्जदाराने/अपिलकर्त्याने माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत दि. 03/03/2025 रोजीच्या अर्जान्वये “मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 1 व 2 मधील सन 2024-25 या वर्षात झालेल्या बांधकामासंबंधीत” माहिती मिळणेकामी केलेल्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास/अपिलकर्त्यास जा.क्र.मनपा/साबां/7158/2024-25, दि. 12/03/2025 रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देऊन आवश्यक शासकीय शुल्काचा भरणा करणेकामी विहीत मुदतीत कळविलेले आहेत. तद्नंतर अपिलकर्ता यांनी पावती क्र. 412796, दि. 18/03/2025 रोजी शासकीय शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.मनपा/साबां/7371/2024-25,दि. 19/03/2025 रोजीच्या पत्रासोबत आवश्यक माहितीची छायापृष्ठे अपिलकर्ता यांस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत कालमर्यादेत माहिती उपलब्ध करुन दिल्याचे निदर्शनास येते. तथापी, योग्य माहिती न मिळाल्यामुळे अपिलकर्ते श्री. संतोष कुमार तिवारी, यांनी या विभागात दि. 02/04/2025 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. सदरील अपिलाची सुनावणी दि. 22/04/2025 रोजी सकाळी 11.30 वा ठेवण्यात आली सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी, श्री. संदीप साळवे, व अपिलीय अधिकारी हजर होते. तथापी, जन माहिती अधिकारी श्री. प्रविण दळवी, हे गैरहजर होते. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन सदरील अपिलावर खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## // निर्णय //

जन माहिती अधिकारी, प्रभाग समिती क्र. 1 व जन माहिती अधिकारी, प्रभाग समिती क्र. 2 यांनी अपिलकर्त्यास त्यांचे दि. 03/03/2025 रोजीचे माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अर्जातील नमुद मुद्दा क्र. 1 ते 3 संबंधीत अपेक्षीलेल्या माहितीचे पून:श्च तपासणी करुन परिपूर्ण माहिती अपिलकर्त्यास 7 दिवसांत प्रभाग समिती निहाय स्वतंत्रपणे निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

सदर अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रांजल कदम)**
**अपिलीय अधिकारी तथा उप-अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**स्थळ :-**
**उप-अभियंता दालन,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**चौथा मजला, मुख्य कार्यालय,**
**भाईंदर (प.).**

**प्रत:-**
1) **श्री. संतोष कुमार तिवारी,**
सी/04, न्यु मिरा पॅराडाईज,
गीता नगर, मिरा भाईंदर रोड,
मिरारोड (पूर्व), ठाणे.
2) **श्री. संदीप साळवे, जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग (प्रभाग समिती क्र. 2)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
3) **श्री. प्रविण दळवी, जनमाहिती अधिकारी बांधकाम विभाग (प्रभाग समिती क्र. 1)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC-12/25-26/PK-RTI-1st Appil-5.

PP

(119)

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्यांचा अधिकार- २०

नमुना पत्र -३

माहिती मिळविण्यांकरिता करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,
मा. शासकीय माहिती अधिकारी, E-4828660
बांधकाम विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

१) अर्जदाराचे नांव -: सतिश सदाशिव हेडगे
मो.नं. ९९६९१९४५२४

२) पत्ता -: ५०५, निरज पार्क, गिता नगर, भाईंदर (प.) जि. ठाणे ४०११०१

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील-:

(एक) माहितीचा विषय -: आदेश व मुळ संचिका

(दोन) माहितीशी संबंधीत कालावधी -: ३० दिवस 2 पृष्ठ

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे -: जा.क्र. मनपा/सावं/दाखला/33/5431/16-17 दि. 3/10/2016 या दिनांकचे ओसी/भोगवटा आदेश, नकाशा, मुळ संचिका माहितीस्तव देण्यात यावी

(चार) माहिती टपालाव्दारे किंवा व्यक्तीश: -: व्यक्तिश:
आवश्यक आहे किंवा कसे

(पाच) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे -: —
ते प्रयोजन

(सहा) अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे -: नाही
किंवा नाही

ठिकाण -: भाईंदर
दिनांक -: ~~४/०४~~ 1/04/2025

अर्जदाराची स्वाक्षरी

O/c

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

जा.क्र. मनपा/साबां/ ५५३३ /2024-25
दि. २५ / ०३ /2025

RIGHT TO INFORMATION

प्रति,
**श्री. सतिश सदाशिव होडगे**
105, निरज पार्क, गीता नगर,
भाईंदर (प.)

**विषय** :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.
**संदर्भ** :- आपलेकडील दि.13/03/2025 रोजीचा अर्ज.

वरील विषयानुसार संदर्भिय पत्राव्दारे आपण माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. तथापी माहिती अधिकार अधिनियम 2005 कायद्याच्या अनुसरुन रु.10, कोर्ट फि स्टॅम्प लावणे बंधणकारक आहे. आपण आपल्या माहिती अधिकार अर्जात रु.5 कोर्ट फि शुल्क लावल्याने संदर्भिय माहिती अधिकारी अर्ज फेटाळण्यात येत आहे. तरी रु.10, कोर्ट फि स्टॅम्प लावुन स्वतंत्र अर्ज सादर करण्यात यावा. पावती क्र.-457202 - दि.15/04/2025
रक्कम - 14 रुपये.

०७ पाने मिळाली
15/04/2025
[signature]

[signature]
**(प्रविण दळवी)**
**कनिष्ठ अभियंता तथा**
**जन माहिती अधिकारी (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

[signature] 28/3/25

o/c

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

जा.क्र. मनपा/साबां/मा.अ./ 280 /2025-26
दि. 09 / 04 /2025

RIGHT TO INFORMATION

प्रति,
श्री. सतिश सदाशिव होडगे,
105, निरज पार्क, गीता नगर,
भाईंदर (प.), ठाणे-401 101.

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आदेश व मुळ संचिका मिळणेबाबत.
संदर्भ :- आपले दि. 01/04/2025 रोजीचे पत्र. (ई-4828660)

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार आपण माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत जा.क्र.मनपा/ साबां/दाखला/33/5431/2016-17, दि. 03/10/2016 रोजीच्या आदेश व नकाशाची छायाप्रत अपेक्षीलेली असून, सदरची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| 1. | जा.क्र.मनपा/ साबां/दाखला/33/5431/ 2016-17, दि. 03/10/2016 रोजीच्या आदेश व नकाशाची छायाप्रत | सदर छायाप्रत पृष्ठ रु 2/- प्रमाणे 2 पृष्ठांसाठी रु. 4/- चा भरणा केल्यानंतर सदरची माहिती जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. |

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास, प्रथम अपीलीय अधिकारी, मा. कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत आपणांस प्रथम अपील दाखल करता येईल.

(प्रविण दळवी)
जन माहिती अधिकारी (सा.बां.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-12/2025-26/PD_MA/L-2

Deepak

E-4951755

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र - ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
जन माहिती अधिकारी,
मा. शहर अभियंता सो.,
बांधकाम विभाग,
मिरा-भाईंदर महानगरपालिका
भाईंदर -प., ता.जि. ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे नाव | :- | श्री. पॅट्रीक जुराण अंद्रात<br>मो.नं. ८५९१७३४९४७ |
| २) | पत्ता | :- | पाली बंदर, पो. उत्तन, उत्तन रोड,<br>भाईंदर -प., ता.जि. ठाणे- ४०१ १०१ |
| ३) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल:- | | |
| | (एक) माहितीचा विषय | :- | मौजे- पाली, ता.जि. ठाणे येथील सर्व्हे नं. ६, हि.नं. ४ या जमिन मिळकतीवर श्री. स्टॅनी अंद्रात याने केलेल्या बांधकामाबाबतची माहिती मिळणेबाबत. |
| | (दोन) माहितीशी संबंधित कालावधी | :- | २००३ ते आजपावेतो |
| | (तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | :- | मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या हद्दीतील मौजे- पाली, ता.जि. ठाणे येथील सर्वे नं. ६, हि.नं. ४ या जमिन मिळकतीवर श्री. स्टॅनी जुराण अंद्रात याने झोपडयाचे रूपांतर करून आर.सी.सी. ३ मजली बांधकाम केलेले आहे. तरी सदर बांधकामाकरीता आपल्याकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती, तसेच आपणांकडुन देण्यात आलेली बांधकाम परवानगी प्रत, मंजुर नकाशा प्रत इ. कागदपत्रांच्या सत्यप्रती मला आपली जी काही शासकीय फी असेल ती घेवुन देण्यात याव्यात. |
| | (चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश: आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) | :- | व्यक्तीश: |
| | (पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) | :- | -- |
| | (सहा) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | :- | न्यायालयीन कामकाजासाठी |
| ३) | अर्जदार दारिद्रय रेषेखाली आहे किंवा कसे (असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी) | :- | नाही |

ठिकाण :- भाईंदर
दिनांक :- ०३/०४/२०२४

पॅट्रीक जुराण अंद्रात

अर्जदाराची स्वाक्षरी
श्री. पॅट्रीक जुराण अंद्रात

0/C E-4981755

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/साबां/मा.अ./ 285 /2025-26
दि. 09 / 04/2025

प्रति,
जन माहिती अधिकारी,
नगररचना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती देणेबाबत.
मौजे-पाली, ता.जि. ठाणे येथील स.क्र. 6 हि.क्र. 4 या जमीन मिळकतीवर श्री. स्टॅनी अंद्रात, यांनी केलेल्या बांधकामाबाबतची माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. पॅट्रीक जुराण अंद्रात, यांचेकडील दि. 03/04/2025 रोजीचे माहिती अधिकार अंतर्गत पत्र. (ई-4879942)

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार अर्जदार, श्री. पॅट्रीक जुराण अंद्रात, यांनी मौजे-पाली, ता.जि. ठाणे येथील स.क्र. 6 हि.क्र. 4 या जमीन मिळकतीवर श्री. स्टॅनी अंद्रात, यांनी केलेल्या बांधकामाबाबतची माहिती अपेक्षीलेली आहे. सदरचा विषय हा आपल्या अखत्यारित येत असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005, कलम 6(3) अन्वये सदरचा अर्ज आपणांस वर्ग करण्यांत येत आहे. अर्जदारास आपले विभागाशी संबंधीत माहिती विहीत मुदतीत आपले स्तरावर उपलब्ध करुन द्यावी.

(प्रविण दळवी)
जनमाहिती अधिकारी (सा.बां.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री. पॅट्रीक जुराण अंद्रात,
पाली बंदर, पो. उत्तन, उत्तन रोड,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे,

गॅलॅडेस पट्रीक अंद्रात

/- संदर्भीय पत्रातील विषय नगररचना विभागाशी संबंधीत असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 चा अर्ज कलम 6(3) अन्वये आपला संदर्भीय अर्ज सदर विभागास वर्ग करण्यांत येत आहे. संबंधीत विभागाकडून आपण माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

PC-12/2025-26/PD_MA/L-1

पोच
9/4/25
लिपीक
नगररचना विभाग
मि.भा.म.न.पा.

# RTI Request & Appeal Management Information System(RTI-MIS)

## Government Of Maharashtra

HOME SEARCH ASSESSMENT UTILITY DPIO FAA LETTERS REPORTS LOGOUT

### ASSESSMENT OF NEW REQUEST

**Public Authority:** Mira Bhaindar Municipal Corporation **Role :** SPIO **User :** Public Work Department

Fields prefixed with * are mandatory

| | |
|---|---|
| **Registration No. :** | MBMCO/R/2025/60146 \| \| View Request Details \| |
| **Type of Receipt :** | Online Receipt |
| **Date of Receipt :** | 21/03/2025 |
| **Language of Request :** | English |
| **Name :** | Shoun Leo Colaco |
| **Gender :** | Male |
| **Address :** | १०९५ कोलासो व्हिला, पोसा हॉस्पिटलच्या शेजारी, देवतलाव – उत्तन, भाईदर (प), Pin:401106 |
| **Phone No. :** | +91-9892418083 |
| **Mobile No. :** | +91-9892418083 |
| **Email :** | shouncolaco@gmail.com |
| **Country :** | India |
| **State :** | Maharashtra |
| **District** | Thane |
| **Tehsil** | Thane |
| **Village** | Mira-Bhayandar (M Corp.) |
| **Status :** | Urban |
| **Educational Status :** | Graduate |
| **Citizenship Status :** | Indian |
| **Mode(s) of information Supply :** | Hard Copy |
| **Is Requester Below Poverty Line ? :** | No |
| **Amount Paid ( ₹) :** | 10 |
| **Does it concern the life or Liberty of a Person :** | Details not provided. |
| **Request Pertains to :** | Public Work Department |
| **Subject Content :** | वेलेंकनी तिर्थमंदिर, उत्तन शेजारील रस्त्याच्या निकृष्ट दर्जाबाबत करण्यात आलेल्या तक्रारीवर झालेल्या कारवाईबाबत माहिती मिळवण्याबाबत. 10.02.2025 रोजी मिरा भाईदर महानगरपालिकेकडे वेलेंकनी तिर्थमंदिर, उत्तन शेजारील कॉंक्रिट रस्त्याच्या निकृष्ट दर्जाबाबत तक्रार केली होती. तरी कृपया खालील माहिती पुरवावी: माझ्या तक्रारीला संबंधित विभागाने काय उत्तर दिले आहे? सदर तक्रारीवर कोणती कारवाई करण्यात आली? ठेकेदाराविरुद्ध कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली? सदर रस्त्याच्या पुनर्बांधणीसंदर्भात कोणती योजना आखण्यात आली? संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे का? या प्रकरणातील संपूर्ण अहवालाची प्रत पुरवावी. मूळ अर्ज: तक्रारीच्या प्रतीसह जोडला आहे. |
| **Please Select the Category of Request :** | -- PLEASE SELECT CATEGORY -- |
| *** Decision :** | --- PLEASE SELECT YOUR NEW ACTION / DECISION --- |
| | Submit |

P.O.
श्री. प्रविण कोळी

SHOUN **COLACO**
VICE PRESIDENT
MIRA BHAYANDER DIST. CONGRESS COMMITTEE

10.02.2025

**प्रति,**
मा. आयुक्त तथा प्रशासक साहेब,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.)

**विषय: वेलेंकनी तिर्थमंदिर, उत्तन शेजारील रस्त्याच्या निकृष्ट दर्जाबाबत तक्रार.**

महोदय,

ऑगस्ट (2024) महिन्यात वेलेंकनी तिर्थमंदिर, उत्तनच्या शेजारी काँक्रिट रस्त्याचे (CC Road) काम पूर्ण करण्यात आले. सदर रस्ता पूर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर नवीन काँक्रिट टाकून तयार करण्यात आला. तथापि, केवळ तीन महिन्यांच्या कालावधीतच या रस्त्यावर **असंख्य भेगा पडल्या असून रस्ता अत्यंत खराब स्थितीत आहे.**

सामान्यतः अशा प्रकारच्या रस्त्यांचे आयुर्मान किमान **25 वर्षे असते**, मात्र अत्यंत कमी कालावधीतच रस्ता खराब झाल्याने त्याच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ही स्थिती **निकृष्ट बांधकाम साहित्याचा वापर, कार्यक्षमतेचा अभाव आणि सार्वजनिक निधीच्या गैरवापराचे स्पष्ट लक्षण आहे.** (आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणचे फोटो अर्जासोबत जोडले आहेत )

**तरी विनंती आहे की:**

- सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधित ठेकेदाराला **काळ्या यादीत (Blacklist) टाकण्यात यावे.**
- सदर रस्त्याच्या पुनर्बांधणीसाठी **योग्य प्रतीच्या साहित्याचा वापर करुन नव्याने रस्ता तयार करण्यात यावा.**
- संबंधित विभागाने ठेकेदाराच्या **कोणत्याही नवीन कामांना निधी वाटप करु नये** व याची लेखी सूचना लेखा विभागास द्यावी.
- सदर प्रकरणात कोणती कारवाई करण्यात आली याबाबत **15 दिवसांच्या आत लेखी अहवाल देण्यात यावा.**
- जर महानगरपालिकेद्वारे अशा निकृष्ट दर्जाच्या कामांना परवानगी दिली जात असेल, तर त्याबाबत नागरिकांनी भविष्यात तक्रार करु नये याकरिता त्याची लेखी माहिती पुरवावी.

1095, COLACO VILLA, DEVTALAO
UTTAN - BHAYANDER (W) THANE 401106

shouncolaco@gmail.com
www.shounleocolaco.blogspot.com

+91 98924 18083
+91 98200 78083

वरील मागण्यांची त्वरित पूर्तता न झाल्यास नागरिकांच्या वतीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा विचार केला जाईल. याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

**प्रतिलिपी:**

- मुख्य लेखा विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका (ठेकेदारास कोणतेही पुढील देयक अदा करू नये.)
- लोकायुक्त, महाराष्ट्र शासन.

आपला नम्र

Colaco

शॉन लिओ कोलासो

| | |
|---|---|
| from: | **Colaco Shoun** <shouncolaco@gmail.com> |
| to: | commissioner@mbmc.gov.in |
| cc: | lokayukta@maharashtra.gov.in, account@mbmc.gov.in |
| date: | Feb 10, 2025, 11:13 AM |
| subject: | वेलेंकनी तिर्थमंदिर, उत्तन शेजारील रस्त्याच्या निकृष्ट दर्जाबाबत तक्रार. |
| mailed-by: | gmail.com |

| | |
|---|---|
| from: | **Commissioner MBMC** <commissioner@mbmc.gov.in> |
| to: | PWD MBMC <pwd@mbmc.gov.in> |
| cc: | Colaco Shoun <shouncolaco@gmail.com> |
| date: | Feb 10, 2025, 11:50 AM |
| subject: | Fwd: वेलेंकनी तिर्थमंदिर, उत्तन शेजारील रस्त्याच्या निकृष्ट दर्जाबाबत तक्रार. |
| signed-by: | mbmc-gov-in.20230601.gappssmtp.com |
| security: | Standard encryption (TLS) Learn more |
| : | Important mainly because it was sent directly to you. |

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम विभाग**

जा.क्र. मनपा/साबां/ ४३० /2025-26
दि. १६/०४/2025

RIGHT TO INFORMATION

प्रति,
**श्री. शॉन कोलासो**
1095, कोलासो व्हिला, पोसा हॉस्पीटलच्या शेजारी,
देवतलाव-उत्तन,
भाईंदर (प.) 401 106

**विषय** :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.
**संदर्भ** :- आपलेकडील दि.21/03/2025 रोजीचे ऑनलाईन माहिती अधिकार अंतर्गत पत्र. MBMCO/R/2025/60146 (प्राप्त दि.09/04/2025) ई-4949195

वरील विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुशंगाने आपणास कळविण्यात येते की, वेलंकनी तिर्थ मंदिर उत्तन शेजारील रस्त्याच्या निकृष्ठ दर्जाच्या कामाबाबतचा तक्रारी अर्ज प्राप्त झाला. सदर रस्त्याच्या दुरुस्ती करीता मे.गजानन कंस्ट्रक्शन यांना जा.क्रमनपा/साबां/3550/2024-25 दि.12/02/2025 रोजी या विभागाकडुन नोटीस देण्यात आली आहे. सदर माहिती एक पृष्ठात उपलब्ध असुन शुल्क रु.2/- चा भरणा करुन सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

(प्रविण दळवी)
**कनिष्ठ अभियंता तथा**
**जन माहिती अधिकारी (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2025-26/PD/MA/L-2

*RTI Request & Appeal Management Information System(RTI-MIS)*

**Government Of Maharashtra**

HOME SEARCH ASSESSMENT UTILITY SPIO FAA LETTERS REPORTS LOGOUT

## ASSESSMENT OF NEW REQUEST

**Public Authority:** Mira Bhaindar Municipal Corporation **Role :** SPIO **User :** Public Work Department

Fields prefixed with * are mandatory

| | |
|---|---|
| **Registration No. :** | MBMCO/R/2025/60192 \| \| View Request Details \| |
| **Type of Receipt :** | Online Receipt |
| **Date of Receipt :** | 08/04/2025 |
| **Language of Request :** | English |
| **Name :** | HARSHAD DHAGE |
| **Gender :** | Male |
| **Address :** | 21/B wing, Ratnadeep Apt.,, Navghar Road, Bhayandar East, Mira Bhayandar, Thane, Pin:401015 |
| **Phone No. :** | +91-9820952079 |
| **Mobile No. :** | +91-9820952079 |
| **Email :** | harshadvdhage0021@gmail.com |
| **Country :** | India |
| **State :** | Maharashtra |
| **District** | Thane |
| **Tehsil** | Thane |
| **Village** | Thane (M Corp.) |
| **Status :** | Rural |
| **Educational Status :** | Graduate |
| **Citizenship Status :** | Indian |
| **Mode(s) of information Supply :** | Hard Copy |
| **Is Requester Below Poverty Line ? :** | No |
| **Amount Paid ( ₹ ) :** | 10 |
| **Does it concern the life or Liberty of a Person :** | Details not provided. |
| **Request Pertains to :** | Public Work Department |
| **Subject Content :** | भाईंदर पश्चिम येथील मोर्वा स्मशानभूमी बाबत नगरपालिका व महानगरपालिकेने वारंवार केलेल्या कामाबाबतची माहिती १. भाईंदर पश्चिम येथील मोर्वा स्मशानभूमी येथे वारंवार ( वर्ष १९९० पासून ते वर्ष २०२५ पर्यंत ) केलेल्या बांधकामाबाबतचे वर्कऑर्डर २. भाईंदर पश्चिम येथील मोर्वा स्मशानभूमी येथे वारंवार ( वर्ष १९९० पासून ते वर्ष २०२५ पर्यंत ) केलेल्या कांदळवन क्षेत्रात बांधकामाबाबत ची परवानगी ( Ministry of Environment,Forest and Climate Change, Government of India - SEIAA, Bombay High Court, Maritime Board, Forest department - Mangrove cell, Collector / Department of Revenue, MPCB, Department of Tourism Maharashtra, Maharashtra Water Resources Regulatory Authority कोस्टल रेग्युलेशन झोन नुसार या सर्व विभागाच्या परवानगी ) |
| **Please Select the Category of Request :** | -- PLEASE SELECT CATEGORY -- |
| *** Decision :** | --- PLEASE SELECT YOUR NEW ACTION / DECISION --- |

Submit

प्रेषित दखल.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

RIGHT TO INFORMATION

**जा.क्र. मनपा/साबां/ मा.अ / ८२५ /2025-26**
**दि. 28 / 04 /2025**

FM973030949IN IVR:6977973030949 भारतीय डाक
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1.25/04/2025.10:12
To:HARSHAD..
PIN:401105. Bhayander East S.O
From:MBMC..
Wt:25gms
Amt:17.70.Tax:2.70.Amt.Paid:18.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>
India Post

**प्रति,**
**श्री. हर्षद ढगे**
21, बी विंग, रत्नदीप अपार्टमेंट,
नवघर रोड, भाईंदर (पुर्व)
ता.जि. ठाणे 401105.

**विषय :-** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणेबाबत.
भाईंदर पश्चिम येथील मोर्वा स्मशानभुमीबाबत नगरपालिका व महानगरपालिकेने वारंवार केलेल्या कामाबाबत

**संदर्भ :-** आपले कडील माहिती अधिकार अंतर्गत क्र.MBMCO/R/2025/60192 दि.08/04/2025 चे दि.17/04/2025 रोजी ऑनलाईन प्राप्त झालेले पत्र. (E-5043600).

विषयांकीत प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुशंगाने कळविण्यात येते की, भाईंदर पश्चिम येथील मोर्वा स्मशानभुमी मध्ये नगरपालिका व महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या कामाच्या कार्यादेशाच्या छायाप्रती यासोबत आपणांस विनामुल्य देण्यात येत असून इतर माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संचिकेचे अवलोकन करून माहिती उपलब्ध करून घ्यावी, ही विनंती.

सोबत :- (पृष्ठ क्र.01 ते 06)

**(प्रविण दळवी)**
**जनमाहिती अधिकारी (साबां)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-05/25-26/PD/MA-1

(69) E5308985

P.D







प्रति ,
शासकीय माहिती अधिकारी
सार्वजनिक बांधकाम विभाग
मीरा भाईंदर महानगरपालिका..

| | | |
|---|---|---|
| 1) | अर्जदाराचे नाव: | जगदीश शंकर डामरे |
| 2) | पत्र व्यवहाराचा पत्ता : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, ऊत्तन रोड, सुभाषचंद्र बोस मैदान समोर, भाईंदर (पश्चिम) Mob no :- 9833574216 |
| 3) | माहितीचा विषय : | मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील बांधकाम विभागामार्फत नेताजी सुभाष चंद्र बोस मैदान समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, गांधीनगर, भोला नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर बी (B) येथील गटाराचे चालू असलेल्या कामाची माहिती मिळण्याबाबत |
| 4) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : | मीरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत वरील ठिकाणी चालू असलेल्या कामाच्या सविस्तर तपशील तसेच कंत्राट दाराची माहिती व मीरा भाईंदर महानगरपालिका व कंत्राटी झालेल्या करारनाम्याची छायांकित प्रत सत्यप्रत करून देण्यात यावी. |
| 5) | माहितीशी संबंधित कालावधी | सन 2022 पासून |
| 6) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील: | वरील प्रमाणे |
| 7) | माहिती टपालाद्वारे किंवा आवश्यक आहे किंवा नाही कसे? :- | व्यक्तिशः |
| 8) | टपाला द्वारे असलेल्या बाबत : | निरंक |
| 9) | अर्जदार दारिद्र्य रेषेखाली आहे किंवा कसे : | नाही |

दण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या साक्षांकित व सत्यप्रतीसही शिक्यानिशी द्यव्यात.

ठिकाण :- भाईंदर
दिनांक :- 8/05/2025

6-मे-2025
अर्जदाराची सही

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

## बांधकाम विभाग


जा.क्र. मनपा/साबां/ १२९८ /2025-26

दि. १४/०५ /2025

RIGHT TO INFORMATION

EM973043015IN IVR:6977973043015
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1.14/05/2025.12:53
To:JAGDISH..
PIN:401101. Bhayander West S.O
From:SARVJANIK BANDHKAM VIBHAG..
Wt:20gms
Amt:17.70.Tax:2.70.Amt.Paid:18.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>

प्रति,
श्री. जगदीश शंकर डामरे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,
उत्तन रोड, सुभाषचंद्र बोस मैदान समोर,
भाईंदर (प.)

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.
मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील बांधकाम विभागामार्फत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, गांधीनगर, भोला नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर बी (B) येथील गटाराचे चालु असलेल्या कामाची माहिती मिळण्याबाबत.

संदर्भ :- आपलेकडील दि.08/05/2025 रोजीचे अर्ज. (ई-5308985)

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील बांधकाम विभागामार्फत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, गांधीनगर, भोला नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर बी (B) येथील गटाराचे चालु असलेल्या कामाची माहिती मिळण्याबाबत आपण संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने आपणास कळविणेत येते की, भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत गटार रस्ता तयार करणे व भाईंदर (प.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथील अंतर्गत गटार तयार करणे या कामासाठी मे. मार्स इन्फ्रा प्रोजेक्ट्स यांना जा.क्रमनपा/साबां/99/ 2024-25 दि.15/10/2024 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशाची छायाप्रत यासोबत विनामूल्य देण्यात येत असून संदर्भिय पत्रात नमूद करारनाम्याच्या छायाप्रतीसाठी शासकीय शूल्क रु. 2/- प्रतिप्रत प्रमाणे रु. 3 X 2 = रु. 6 चा भरणा करुन छायाप्रती प्राप्त करुन घ्याव्यात हि विनंती.

(प्रविण दळवी)
कनिष्ठ अभियंता तथा
जन माहिती अधिकारी (साबां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2025-26/PD/MA/L-3

PD E-5466379

(20)

माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मीरा भाईंदर महापालिका.

अर्जदाराचे नाव व पत्ता,
ओम प्रकाश अग्रवाल (गडोडिया),
गाळा क्रमांक ५. गाड़ोदिया सदन,
मोदी पटेल रोड,
भाईंदर पश्चिम,
मोबाईल नंबर ९८२१८१७०३८




माहितीच्या तपशील: <u>भाईंदर पश्चिम मांडली तलाव सुशोभीकरण कामा बाबत</u>

माहितीचे वर्णन

- मांडली तलाव सुशोभीकरण बाबत प्रशासकीय ठराव सत्यप्रत
- सुशोभीकरण कामासाठी केलेला नकाशाची सत्यप्रत
- सुशोभीकरण कामासाठी बजेटमध्ये केली तरतूद किंवा कोणत्या निधीतून सदर काम करण्यात येते
- मंजूर निधी एकूण रक्कम
- कामाचा सुरुवातीसाठी आधी केलेली स्ट्रक्चर रिपोर्ट
- सदर तलाव शंभर वर्षापूर्वीचे असल्याने पुरातत्त्व विभागाची परवानगी घेतली आहे काय कामाच्या ठिकाणी माहिती फलक कामाच्या तपशील बाबतची माहिती फलक ठेकेदाराने लावलेल्याची फोटोकॉपी
- कामाची मुद्दत
- कामाच्या अटी शर्ती ची सत्यप्रत

माहिती टपालाने किंवा व्यक्तीस        व्यक्तीसह
ठिकाण भाईंदर पश्चिम
दिनांक. 21/05/2025

अर्जदाराचे नाव व सही
Omprakash G Agarwal
ओम प्रकाश अग्रवाल गाडोडिया
माजी नगरसेवक
9821817038

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

## बांधकाम विभाग

जा.क्र. मनपा/साबां/ ९६८५ /2025-26

दि. २८ / ०५ /2025

RIGHT TO INFORMATION

EM979511524IN IVR:6977979511524
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1.28/05/2025.12:01
To:OM PRAKASH ..
PIN:401101. Bhayander West S.O
From:SARVJANIK BANDHKAM VIBHAG..
Wt:20gms
Amt:17.70.Tax:2.70.Amt.Paid:18.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>

भारतीय डाक India Post

प्रति,
**श्री. ओम प्रकाश अग्रवाल (गडोडिया)**
गाळा क्रमांक 5, गाडोदिया सदन,
मोदी पटेल रोड,
भाईंदर (प.)

**विषय :-** <u>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.</u>
भाईंदर पश्चिम मांडली तलाव सुशोभिकरण कामाबाबत.

**संदर्भ :-** आपलेकडील दि.21/05/2025 रोजीचे अर्ज. (ई-5466379)

महोदय,

वरील विषयानुसार संदर्भिय पत्राव्दारे माहिती अधिकार पत्र इकडील विभागास प्राप्त झाला आहे. संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| • मांडली तलाव सुशोभिकरण बाबत प्रशासकीय ठराव सत्यप्रत्य,<br>• सुशोभिकरण कामासाठी बजेटमध्ये केली तरतुद किंवा कोणत्या निधीतुन सदर काम करण्यात येते<br>• मंजुर निधी एकुण रक्कम<br>• कामाची मुदत<br>• कामाची अटी शर्ती ची सत्यप्रत<br>• काय कामाच्या ठिकाणी माहिती फलक कामाच्या तपशील बाबतची माहिती फलक ठेकेदाराने लावलेल्याची फोटोकॉपी | सदरची माहिती करीता 4 X 2 = 8/- रुपयाचा भरणा करावा. |
| • सुशोभिकरण कामासाठी केलेला नकाशाची सत्यप्रत | सदरची माहिती करीता 1 X 100 = 100/- रुपयाचा भरणा करावा. |
| • कामाचा सुरुवातीसाठी आधी केलेली स्ट्रक्चर रिपोर्ट<br>• सदर तलाव शंभर वर्षापुर्वीचे असल्याने पुरातत्व विभागाची परवानगी घेतली आहे | सदरची माहिती अभिलेख तपासले असता संचिकेत उपलब्ध नाही. |

वरील प्रमाणे भरणा महानगरपालिका फंडात केल्यानंतर भरणा केलेली पावती या कार्यालयास सादर केल्यानंतर आपणास आवश्यक माहितीच्या छायाकिंत प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

तरी उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 अन्वये आपणास प्रथम अपिल श्री. प्रांजल कदम, उप अभियंता, अपिलीय अधिकारी, चौथा मजला, मुख्य कार्यालय यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत दाखल करता येईल.

(प्रविण दळवी)
कनिष्ठ अभियंता तथा
जन माहिती अधिकारी (साबां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2025-26/PD/MA/L-4

PD

(134)

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या

## Format of application for obtaining information under the Right of Information Act, 2005

### अर्जाचा नमुना

### Application Form

10रु. कोर्ट फी Rs.10 COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

प्रति,

To, माननीय,

E-5480567

माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर मनपा कार्यालय.

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : श्री प्रमोद गजानन भोईर (मो. नं. 9892874680)
Full Name of the applicant

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : २८९, महालीआळी, राईगाव, भाईंदर (प.), तालुका व जिल्हा ठाणे
Address पिन कोड :- ४०११०१.

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :
Particulars information required जा. क्र. मनपा/सा.बां./कार्या/१५१/२०२४-२५ दिनांक १३/०३/२०२५ रोजी मे. स्पार्क सिव्हिल इन्फ्राप्रोजेक्टस्, 408, बी, अर्थ रेसिडन्सी, डी एन दुबे रोड, रतननगर, बोरिवली (पूर्व) मुंबई - 68. यांना निविदा मंजूरी दिलेल्या कार्यादेशाची प्रत व ही निविदा मिळवण्यासाठी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांची तसेच कामाच्या अटी शर्तीच्या कागदपत्रांच्या संचिका माहितीसाठी मिळावी. हि विनंती
यासाठी लागणारी फी भरण्यास मी तयार आहे.

माहिती ज्याच्याशी संबंधीत असले तो कालावधी # : सन २०२४ ते आजपर्यंत
The period to which the information relates

माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether information is required by post or in person स्वतः घेऊन जाणार आहे.
(जादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल) :

(The actual postal charges shall be included in additional fees)

जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे : ——x——
In case by post
(साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने)
(Ordinary, Registered or Speed)

४) अर्जदार दारिद्र्यरेषेखाली आहे किंवा कसे : होय/नाही नाही
Whether the applicant is below poverty line : (Yes/No)
(असल्यास त्याच्या पुराव्याखाल छायाप्रत जोडावी)

दिनांक
Date 29/05/2025

ठिकाण
Place भाईंदर (प.)

(प्रमोद गजानन भोईर)
अर्जदाराची सही
Signature of the Applicant

*विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन देणे/सेवाविषयक बाब/लायसेन्स इत्यादी)
Broad Category of the subject be indicated (such) as grant of Govt. Land/Service matter/Licenses etc.)
# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालावधी दर्शविण्यात यावा.
Relevant period for which information I required to be indicated
$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.
Specific details of the information is required to be indicated

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम विभाग**

जा.क्र. मनपा/साबां/ ३६६९ /2025-26

दि. 28 / 05 /2025

<Dial 18002666868><Wear mask -Stay safe>
भारतीय डाक
EM979512272IN IVR:6977979512273
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1.29/05/2025.11:07
India Post
To:PROMOD..
PIN:401101. Bhayander West S.O
From:MBMC .BHAYANDER WEST
Wt:10gms
Amt:17.70.Tax:2.70.Amt.Paid:18.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>

RIGHT TO INFORMATION

प्रति,
**श्री. प्रमोद गजानन भोईर**
289, मधलीआळी,
राईगाव, भाईंदर (प.)

**विषय :-** **माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.**
जा.क्र.मनपा/साबां/कार्या/159/2024-25 दि.13/03/2025 रोजी मे.स्पार्क सिव्हिल इन्फ्राप्रोजेक्ट्स, 408, बी अर्थ रेसिडेन्सी, डी एन दुबे रोड, रतननगर, बोरिवली (पुर्व) मुंबई-68 यांना निविदा मंजुरी दिलेल्या कार्यादेशाची प्रत मिळणेबाबत

**संदर्भ :-** आपलेकडील दि.21/05/2025 रोजीचे अर्ज. (ई-5480567)

**महोदय,**

जा.क्र.मनपा/साबां/कार्या/159/2024-25 दि.13/03/2025 रोजी मे.स्पार्क सिव्हिल इन्फ्राप्रोजेक्ट्स, 408, बी अर्थ रेसिडेन्सी, डी एन दुबे रोड, रतननगर, बोरिवली (पुर्व) मुंबई-68 यांना निविदा मंजुरी दिलेल्या कार्यादेशाची प्रत मिळण्याबाबत आपण संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने आपणास कळविणेत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील भाईंदर (प.) राईगाव येथील राममंदिर तलाव प्रेक्षक गॅलरी व पत्राशेड उभारणे व परिसर सुशोभिकरण करणे या कामाचे कार्यादेश मे.स्पार्क सिव्हिल इन्फ्राप्रोजेक्ट्स यांना देण्यात आलेले आहे सदर कार्यादेशाची छायाप्रत यासोबत विनामूल्य देण्यात येत असून संदर्भिय पत्रात नमूद ईतर माहितीसाठी आपण कार्यालयीन वेळेत संचिकेचे अवलोकन करुन उपलब्ध माहिती प्राप्त करुन घ्यावी तसेच अपेक्षित छायाप्रतीसाठी शासकीय शूल्क रु. 2/- प्रतिप्रत प्रमाणेचा भरणा करुन छायाप्रती प्राप्त करुन घ्याव्यात हि विनंती.

**(प्रविण दळवी)**
**कनिष्ठ अभियंता तथा**
**जन माहिती अधिकारी (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2025-26/PD/MA/L-3

P.D (133)

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या

**Format of application for obtaining information under the Right of Information Act, 2005**

अर्जाचा नमुना

E-5430702 **Application Form**

[Court fee stamp: 10 रु. COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES]

प्रति,

To, माननीय

माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर मनपा कार्यालय

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : श्री प्रमोद गजानन भोईर मो.नं. 9892874680
Full Name of the applicant

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : २८९, मधलीआळी, राईगाव, भाईंदर (प.), ता.व जि.-ठाणे
Address पिन कोड :- ४०११०१.

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :
Particulars information required मौजे राई गावठाणातील यशवंत मास्तर मार्ग ते श्री राममंदिर पर्यंतचा रस्ता हा राईगाव हे महानगर पालिकेत समाविष्ठ झाल्यापासून ते आजपर्यंत ज्या ज्या वेळेला रस्त्याचे व त्या रस्त्याच्या डागडुजीचे असे काम झाले आहे की, 'त्यावरुन १६(सोळा) टनापेक्षा जास्त वजन असणाऱ्या व त्यात सहा-सात ब्रास माती व दगड भरुन नेऊ शकतील' अशा दिलेल्या निविदांच्या कार्यादेशाच्या प्रती माहितीसाठी मिळाव्यात हि विनंती.
यासाठी लागणारी फी भरण्यास मी तयार आहे

माहिती ज्याच्याशी संबंधीत असले तो कालावधी # : राईगाव महानगरपालिकेत समाविष्ठ झाल्यापासून ते आजपर्यंत
The period to which the information relates

माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether information is required by post or in person माहिती स्वतः घेऊन जाणार आहे
(जादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल) : ____

(The actual postal charges shall be included in additional fees)

जर टपालानें माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे : — X —
In case by post
(साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने)
(Ordinary, Registered or Speed)

४) अर्जदार दारिद्रयरेषेखाली आहे किंवा कसे : होय/नाही नाही
Whether the applicant is below poverty line : (Yes/No)
(असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी)

दिनांक 29/05/2025 ठिकाण भाईंदर (प्रमोद गजानन भोईर)
Date Place अर्जदाराची सही
Signature of the Applicant

*विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन देणे/सेवाविषयक बाब/लायसेन्स इत्यादी)
Broad Category of the subject be indicated (such ) as grant of Govt. Land/Service matter/Licenses etc.)
# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालावधी दर्शविण्यात यावा.
Relevant period for which information I required to be indicated
$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.
Specific details of the information is required to be indicated

o/c

# मिरा भाईंदर महानगरपालिका


स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८


**बांधकाम / विद्युत विभाग**

स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/साबां/माअ/९५६०/2025-26
दि.०२/०६/2025

प्रति,
**श्री. प्रमोद गजानन भोईर**
289, मधलीआळी,
राईगाव भाईंदर (प.)

**विषय :-** <u>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.</u>
मौजे राई गावठणातील यशवंत मास्तर मार्ग ते श्री राममंदिर पर्यंतच्या रस्त्याबाबत

**संदर्भ :-** आपलेकडील दि.21/05/2025 रोजीचे अर्ज. (ई-530702)

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुशंगाने कळविणेत येते की, आपल्या संदर्भिय पत्रात नमुद मौजे राई गावठणातील यशवंत मास्तर मार्ग ते श्री राममंदिर पर्यंतचा रस्ता हा अंतर्गत रस्ता असुन सदर रस्त्याची आवश्यकतेनुसार वेळोवेळी दुरुस्ती करणेत येत असते. सदर दुरुस्ती वेळेस वापरण्यात येणाऱ्या डांबराची वेळोवेळी चाचणी करुन घेण्यात येते.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी, मा. उप अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत आपणांस प्रथम अपील दाखल करता येईल.

(प्रविण दळवी)
जनमाहिती अधिकारी (साबां)
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-6/25-26/PD/MA-7

EM979516274IN IVR:6977979516274
SP BHAYANDER WEST S.O <401101> भारतीय डाक
Counter No:1.04/06/2025.10:58
To:PROMOD GAJANAN BHOIR..
PIN:401101. Bhayander West S.O
From:MBMC .BHAYANDER WEST
Wt:20gms
Amt:17.70.Tax:2.70.Amt.Paid:18.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 18002666868><Wear mask -Stay safe>

E-5636833

RTI Request & Appeal Management Information System(RTI MIS)

Government Of Maharashtra

HOME SEARCH ASSESSMENT UTILITY DPIO FAA LETTERS REPORTS LOGOUT

ASSESSMENT OF NEW REQUEST

**Public Authority:** Mira Bhaindar Municipal Corporation **Role :** SPIO **User :** Public Work Department

Fields marked with * are mandatory

| | |
|---|---|
| **Registration No. :** | MBMCO/R/2025/60312 \| \| View Request Details \| |
| **Type of Receipt :** | Online Receipt |
| **Date of Receipt :** | 06/06/2025 |
| **Language of Request :** | English |
| **Name :** | Moinuddin Gafoorsab Sayed |
| **Gender :** | Male |
| **Address :** | 304/B-6 Adeshwar Society, Shanti nagar sector-11, Miraroad East, Pin:401107 |
| **Phone No. :** | +91- |
| **Mobile No. :** | +91-9870097365 |
| **Email :** | mgs.pol@gmail.com |
| **Country :** | India |
| **State :** | Maharashtra |
| **District** | Thane |
| **Tehsil** | Thane |
| **Village** | Mira Bhayandar (M Corp.) |
| **Status :** | Urban |
| **Educational Status :** | |
| **Citizenship Status :** | Indian |
| **Mode(s) of information Supply :** | Hard Copy |
| **Is Requester Below Poverty Line ? :** | No |
| **Amount Paid ( ₹ ) :** | 10 |
| **Does it concern the life or Liberty of a Person :** | Details not provided. |
| **Request Pertains to :** | Public Work Department |
| **Subject Content :** | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर पश्चिम, उत्तन, वेलांकनी चर्च समोर सीसीरोडच्या बाधकामाशी संबंधित सर्व माहिती मिळणे बाबत. |
| **Please Select the Category of Request :** | -- PLEASE SELECT CATEGORY -- |
| *** Decision :** | --- PLEASE SELECT YOUR NEW ACTION / DECISION --- |

Submit

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

## बांधकाम विभाग

जा.क्र. मनपा/साबां/ मअ/१८५५ /2025-26
दि. १० / ०८ /2025

RIGHT TO INFORMATION

EM979524253IN IVR:6977979524253
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1.11/06/2025.10:36
To:MOINUDDIN GAFURSAB..
PIN:401107. Mira Road S.O
From:MBMC.SARVAJANIK BANDH
Wt:20gms
Amt:17.70.Tax:2.70.Amt.Paid:18.00(Cash)
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 18002666868><Wear mask -Stay safe>

प्रति,
**श्री. मोईनुद्दीन गफुरसाब सय्यद**
304/बी-6 आदेश्वर सोसायटी,
शांतीनगर सेक्टर -11,
मिरारोड (पु.) 401107

**विषय :-** **माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.**
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम उत्तन, वेलंकनी चर्च समोर सी.सी. रोडच्या बांधकामाशी संबंधित माहिती मिळणेबाबत.

**संदर्भ :-** आपलेकडील दि.06/06/2025 रोजीचे ऑनलाईन माहिती अधिकार अंतर्गत पत्र. MBMCO/R/2025/60312 (ई-5636833)

**महोदय,**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम उत्तन, वेलंकनी चर्च समोर सी.सी. रोडच्या बांधकामाशी संबंधित माहिती मिळणेसाठी आपण संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे; त्याअनुषंगाने आपणास कळविणेत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम उत्तन, वेलंकनी चर्च समोर सी.सी. रोडच्या कामासाठी ठेकेदार मे. स्पार्क सिव्हिल इंन्फ्राप्रोजेक्टस यांना इकडिल पत्र क्र. मनपा/साबां/कार्या/157/2024-25 दि.07/03/2025 अन्वये कार्यादेश देण्यात आलेले असून सदर काम या कार्यादेशाअंतर्गत करणेत येत आहे. सदर कार्यादेशाची छायाप्रत यासोबत आपणास विनामूल्य देण्यात येत असुन संदर्भिय पत्रात नमूद ईतर माहितीसाठी आपण कार्यालयीन वेळेत संचिकेचे अवलोकन करून उपलब्ध माहिती प्राप्त करुन घ्यावी तसेच अपेक्षित छायाप्रतीसाठी शासकीय शूल्क रु. 2/- प्रतिप्रत प्रमाणेचा भरणा करून छायाप्रती प्राप्त करुन घ्याव्यात हि विनंती.

**(प्रविण दळवी)**
**कनिष्ठ अभियंता तथा**
**जन माहिती अधिकारी (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-06/2025-26/PD/MA/L-9

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**


RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/साबां/वि./माअ/२८९ /2025-26
दि. ०९ / ०७ /2025

प्रति,
**मोईनुद्दीन गफुरसाब सय्यद**
304/बी-6, आदेश्वर सोसायटी,
शांतीनगर सेक्टर-11,
मिरारोड (पु.) 401 107

**विषय** :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत.
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम उत्तन, वेलंकनी चर्च समोर सी.सी. रोडच्या बांधकामाशी संबंधित माहिती मिळणेबाबत.

**संदर्भ** :- आपले कडील दि.06/06/2025 रोजीचे ऑनलाईन माहिती अधिकार अंतर्गत पत्र. MBMCO/R/2025/60312 (ई-5636833)

वरील संदर्भिय विषयानुसार आपण माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत भाईंदर पश्चिम उत्तन, वेलंकनी चर्च समोर सी.सी. रोडच्या बांधकामाशी संबंधित माहिती मागितलेली आहे सदर माहिती कामी प्रती प्रत रु.2/- याप्रमाणे एकूण पृष्ठ क्र.48 x 2 = रु.96/- इतका माहिती छायांकीत भरणा करून या विभागाकडून माहिती प्राप्त करून घेण्यात यावी.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी, मा. उप अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत आपणांस प्रथम अपील दाखल करता येईल.

(प्रविण दळवी)
जनमाहिती अधिकारी (साबां)
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-06/25-26/PD/MA-18

PD

(132)

सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

Application for obtaining information under the Right to information Act,2005

E-5518313

प्रति,
जन माहिती अधिकारी
**सार्वजनिक बांधकाम - विद्युत विभाग - मिरा-भाईंदर महानगरपालिका,**
**इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (पश्चिम).**

| | | |
|---|---|---|
| १. अर्जदाराचे पूर्ण नाव<br>Full name of the applicant | : | **शॉन लिओ कोलासो \| मो. 9892418083** |
| २. अर्जदाराचा पूर्ण पत्ता<br>Address | : | **1095 कोलासो व्हिला, पोसा हॉस्पिटलच्या शेजारी, देवतलाव – उत्तन, भाईदर (प) \| shouncolaco@gmail.com** |
| ३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील<br>Particulars of information required | : | **प्रभाग 24 (उत्तन व परिसर) तसेच उत्तन - भाईंदर मार्गावरील गतिरोधकांबाबत माहिती मिळणेबाबत.** |
| (एक) माहितीचा विषय<br>Subject matter of information | : | **वरीलप्रमणे** |
| (दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी<br>The period to which the information relates. | : | **1 जानेवारी 2020 ते आजपर्यंत** |
| (तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन<br>Description of the information is required. | : | • |

**दिनांक 24.03.2025 रोजी मा. श्री. नितिन मुकणे सर, विभाग प्रमुख (सार्वजनिक बांधकाम / विद्युत विभाग) यांना उत्तन मोठागाव येथे उभारण्यात आलेल्या गतिरोधकांचे मोजमाप व तपशील मागवण्यासाठी पत्र सादर करण्यात आले होते. तरीसुद्धा आजतागायत कोणतीही लेखी किंवा ई-मेलद्वारे उत्तर प्राप्त झालेले नाही.**
**(पत्र सोबत जोडले आहे)**

**1. वरील दिनांकाच्या पत्राच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आली आहे का? असल्यास, त्याची प्रत सादर करावी.**

**2. सदर पत्रावर कोणती माहिती अर्जदारास देण्यात आली आहे? त्या माहितीची सविस्तर प्रत पुरवावी.**

**3. जर कोणतीही कार्यवाही झाली नसेल, तर त्याचे कारण लेखी स्वरुपात द्यावे.**

**उत्तन व परिसर (प्रभाग. 24,) तसेच उत्तन - भाईंदर मार्गावरील गतिरोधकांबाबत खालील माहिती आवश्यक आहे:**

**4. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर क्षेत्रात उभारण्यात आलेल्या सर्व गतिरोधकांचे अधिकृत मोजमाप (लांबी, रुंदी, उंची व ढाल) नकाशा यादीसह सादर करावेत.**

5. **गतिरोधक उभारण्यासाठी झालेला खर्च (प्रति गतिरोधक) सादर करावा.**

6. **गतिरोधकाजवळ उभारण्यात आलेल्या वाहतूक सूचना फलकांचे / साइनबोर्डचे प्रति साइन बोर्ड / प्रति गतिरोधक खर्च सादर करावा.**

